Telegram : SAHASANGH
E-mail : sahasangh @yahoo.in
Phone No.020-26122640 & 26129584

# महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या,पुणे

५ बी.जे.रोड,पुणे - ४११ ००१

जा.क्र.प्रसिध्दी / सहकार सप्ताह / ६२९/२०२३-२०२४ दिनांक : 3/11/2023

**विषय :-७० वा अखिल भारतीय सहकारी सप्ताह साजरा करण्याबाबत..**

**महोदय,**

भारतीय राष्ट्रीय सहकारी संघ नवी दिल्ली, ( एन.सी.यु. आय.) यांचेवतीने दरवर्षी दि.१४ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर या कालावधीत संपूर्ण देशात अखिल भारतीय सहकारी सप्ताहाचे आयोजन केले जाते. यावर्षी सुध्दा ७० वा अखिल भारतीय सहकारी सप्ताह संपूर्ण देशात **दि.१४ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर २०२३** या मुदतीत साजरा करण्यात येणार आहे.

या वर्षाच्या सहकार सप्ताहाची मुख्य संकल्पना **" भारताची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलरची करणे आणि शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यात सहकारी यंत्रणेची भूमिका "** ही आहे. भारतीय राष्ट्रीय सहकारी संघ, नवी दिल्ली यांनी निश्चित केलेल्या विषयानुसार सहकार सप्ताहाचे सात दिवस साजरे करण्याकरीता पुढील प्रमाणे कार्यक्रमाचे नियोजन केले आहे.तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या.पुणे व सहकार खाते महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने संपुर्ण राज्यात सहकार सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन करण्यांत येणार आहे.

**७० वा अखिल भारतीय सहकारी सप्ताह दि.१४ ते २० नोव्हेबर २०२३**

| अ.क्र | दिनांक | विषय |
|---|---|---|
| १ | १४.११.२०२३ मंगळवार | वर्तमान काळात सहकारामध्ये दिसुन येत असलेले विकासात्मक बदल. |
| २ | १५.११.२०२३ बुधवार | सहकारी बिगर पतसंस्थांचा पुनरूध्दार आणि वित्तीय समावेशीकरण करणे. |
| ३ | १६.११.२०२३ गुरुवार | सहकारी संस्थांनी आपले डिजिटलायझेशन करून घेण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा स्विकार व अद्यावतीकरण करणे. |
| ४ | १७.११.२०२३ शुक्रवार | सहकारी संस्थांसाठी उपलब्ध असलेली उद्योन्मुख क्षेत्रे व त्यांनी व्यवसाय करण्यासाठी सुलभीकरण करणे. |
| ५ | १८.११.२०२३ शनिवार | सरकारी, खाजगी व सहकारी संस्था यांच्यातील भागीदारी बळकट करणे. |
| ६ | १९.११.२०२३ रविवार | महिला,युवक आणि आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी सहकारी संस्थांची स्थापना करणे. |
| ७ | २०.११.२०२३ सोमवार | सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाचा पुनरूध्दार करणे. |

सहकारी संस्थांच्या सहकार्याने व संघाचे घटक कार्यालयांनी,जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक,सहकारी संस्थांचे फेडरेशन,नागरी सहकारी बँक यांचे सहकार्याने आपले उचित स्तरावर वरील प्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करुन सहकार सप्ताह साजरा करावा.सहकार सप्ताह कार्यक्रमानिमित्त पार पाडलेल्या कार्यक्रमाच्या बातम्या, वृत्तांत यांची कात्रणे एकत्रित करुन संघाकडे पाठवावीत,असे आवाहन करण्यात येत आहे.

सहनिबंधक, सहकारी संस्था
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी

Scanned with OKEN Scanner